**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**पृ.शी.मु.शी.:** सदस्यांचा परिचय

**सभापती :** कालच्या दिनक्रमामधील नवनिर्वाचित सदस्यांचा परिचय हा एक महत्वाचा विषय राहिला आहे. सन्माननीय सदस्य श्री.चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित आहेत का ?

(सन्माननीय सदस्य श्री.चंद्रशेखर बावनकुळे उभे राहून सदनातील सर्व सन्माननीय सदस्यांना अभिवादन करतात.)

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सदनातील नियम, प्रोटोकॉल सर्व गुंडाळत चालले आहे. राष्ट्रगीत होत नाही. शासनाच्या वतीने सदनाचे नेते नवनिर्वाचित सदस्यांची सदनाला ओळख करुन देत असतात. त्यामुळे सदनात हे काय सुरु आहे ?

**सभापती** : सदनामध्ये संसदीय कार्य मंत्री उपस्थित नाहीत. त्यामुळे त्यांच्याऐवजी माननीय मंत्री श्री.जयंत पाटील नवनिर्वाचित सदस्यांचा परिचय सदनाला करुन देतील.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचा थोडा गैरसमज झाला आहे. परंतु असा कोणताही प्रश्न नाही. नागपूर स्थानिक प्राधिकारी संस्था मतदार संघातर्फे निर्वाचित सदस्य तसेच अनेक वर्षांपासून आमचे मित्र आहेत. ते सदनामध्ये नसताना आम्हाला त्यांची नेहमी आठवण येत होती असे सन्माननीय सदस्य श्री.चंद्रशेखर बावनकुळे यांचा आपणांस व आपल्या मार्फत सभागृहास परिचय करुन देताना मला अतिशय आनंद होत आहे.

सभापती महोदय, अकोला-बुलढाणा-वाशिम स्थानिक प्राधिकारी संस्था मतदार संघातर्फे निर्वाचित सदस्य श्री.वसंत खंडेलवाल यांचा आपणांस व आपल्या मार्फत सभागृहास परिचय करुन देताना मला अतिशय आनंद होत आहे.

---------

असुधारित प्रत

**नियम २८९ अन्वये दिलेल्या सूचनेसंबंधी**

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदय, आम्ही नियम २८९ अन्वये आपल्याकडे सूचना दिलेली आहे...

**सभापती :** मी आपल्याला सांगू इच्छितो की, मी प्रथम प्रश्नोत्तरे पुकारतो व त्यानंतर नियम २८९ अन्वये आपण दिलेल्या सूचनेवर आपल्याला म्हणणे मांडण्याची संधी देतो.

श्री.प्रवीण दरेकर : ठीक आहे.

**सभापती** : तारांकित प्रश्न क्रमांक ११८००......

मी आता प्रश्नोत्तरे पुकारली आहे. परंतु माननीय विरोधी पक्षनेत्यांच्या विनंतीला मान देऊन मी त्यांना नियम २८९ वर बोलण्याची परवानगी देत आहे. परंतु आपल्या नेहमीच्या नियमाप्रमाणे नियम २८९ अन्वये दिलेल्या सूचनांवर प्रश्नोत्तराच्या तासानंतरच चर्चा होईल. आज एकंदरीत या विषयाचे महत्व लक्षात घेता मी माझ्या अधिकारामध्ये माननीय विरोधी पक्षनेत्यांना नियम २८९ वर बोलण्याची परवानगी देत आहे.

आज दिनांक ४ मार्च, २०२२ रोजी सन्माननीय सदस्य सर्वश्री प्रवीण दरेकर, भाई गिरकर, सुरेश धस, गोपिचंद पडळकर, सदाभाऊ खोत, ॲड. निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, डॉ.रणजित पाटील, ॲड. निलय नाईक, श्री.प्रसाद लाड, वि.प.स. यांनी सकाळी ९.४३ वाजता ओबीसी आरक्षणाच्या प्रश्नाबाबत माननीय सर्वोच्च न्यायालयात योग्य पद्धतीने बाजू न मांडल्यामुळे ओबीसी आरक्षणाचा प्रश्न अद्याप सुटलेला नसणे या विषयासंबंधी म.वि.प. नियम २८९ अन्वये सूचना दिली आहे. त्यावर माननीय विरोधी पक्षनेत्यांनी थोडक्यात आपले म्हणणे मांडावे.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदय, महाराष्ट्रातील ओबीसीच्या आरक्षणासंबंधी अतिशय महत्वाच्या व निकडीच्या विषयासंबंधी आम्ही म.वि.प. नियम २८९ अन्वये सूचना दिली आहे. मी त्याकडे आपले व सदनाचे लक्ष वेधू इच्छितो. सभापती महोदय, या सरकारने ओबीसी आरक्षणाची हत्या केली आहे असे

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर...

सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालामुळे समोर आले आहे. दिनांक १३ डिसेंबर, २०१९ रोजी सर्वोच्च न्यायालयाने राज्य शासनाला सर्वप्रथम इम्पीरिकल डाटा गोळा करण्याचे आदेश दिले होते. परंतु २७ महिने उलटून गेले तरी राज्य शासन कोणत्याही प्रकारचा इम्पीरिकल डाटा गोळा करु शकले नाही व त्यासंबंधी राज्य शासनाने कोणतीही कार्यवाही केली नाही. परिणामी दिनांक ४ मार्च, २०२१ रोजी सर्वोच्च न्यायालयाने ओबीसी आरक्षण रद्द केले आणि पुनर्विचार याचिकेमध्ये इम्पीरिकल डाटा गोळा करण्यास सांगितले. १२ महिने होऊन सुद्धा राज्य शासन इम्पीरिकल डाटा गोळा करीत नाही अशा प्रकारचा आरोप आहे. आयोगाकरिता कर्मचारी देणे किंवा निधी देणे याबाबत राज्य शासनाने गांभीर्याने घेतले नाही. आयोगाने स्पष्टपणे सांगितले होते की, तंतोतंत इम्पीरिकल डाटा गोळा करावा लागेल. अन्यथा न्यायालय ऐकणार नाही. परंतु सरकारने आयोगाचे म्हणणे ऐकले नाही. स्वत:चे घोडे दामटवत सरकार पुढे जात राहिले. तसेच राज्य शासनाने यासंबंधी प्रत्यक्षात कोणतीही कृती न करता केंद्र शासनाशी वाद घालण्यामध्ये संपूर्ण वर्ष घालविले. त्यामुळे न्यायालयाने राज्य शासनाचे कान उपटले. त्यानंतर राज्य शासनाने घाईघाईने आयोगाकडून अहवाल घेतला व न्यायालयामध्ये सादर केला. सभापती महोदय, न्यायालय भावनेवर नव्हे तर प्रत्यक्ष आकडेवारीवर काम करीत असते. परंतु येथेही राज्य शासनाकडून चालढकलीचे राजकारण करण्यात आले. सर्वोच्च न्यायालयाने परवा दिलेल्या निकालामध्ये काही मुद्दे स्पष्टपणे मांडलेले आहेत. आयोगाच्या अंतरिम अहवालामध्ये इम्पीरिकल डाटा अभ्यास न करता दिला असल्याचे न्यायालयाने ताशेरे ओढलेले आहेत. आयोगाने त्यांच्याकडे उपलब्ध झालेला इम्पीरिकल डाटा माहितीची पडताळणी केली आहे किंवा नाही ? सदर पडताळणी करणे गरजेचे होते. अशा प्रकारे न्यायालयामध्ये दिलेली माहिती सत्य आहे की असत्य आहे ? याबाबत निष्कर्ष काढता येत नाही असे न्यायालयाने सांगितले आहे. या सर्व बाबी लक्षात घेता सर्वोच्च न्यायालयाने राज्य शासनाच्या मागासवर्ग आयोगाचा अहवाल फेटाळला. मी तसेच माननीय श्री.देवेंद्र फडणवीस किंबहुना संपूर्ण विरोधी पक्षाने ओबीसी आरक्षणाच्या बाजूने राज्य शासनाला मदत करण्याची भुमिका घेतलेली आहे. तसेच

श्री.प्रवीण दरेकर...

इम्पीरिकल डाटासंबंधी प्रक्रिया करुन तो जमा करण्याची आवश्यकता होती. परंतु तशी कार्यवाही न करता थातूरमातूर पद्धतीने इम्पीरिकल डाटा गोळा करण्यात आला. परिणामी तो न्यायालयामध्ये टिकू शकला नाही. काही गावांनी आपापल्या गावांचा डाटा गोळा केला. त्यात दिघंची गावाचा समावेश आहे. परंतु राज्य शासन तशी कार्यवाही करु शकले नाही. त्यामुळे राज्य शासन ओबीसी आरक्षणासंबंधी गंभीर नाही. न्यायालयाने या संदर्भात अनेक स्ट्रीक्चर्स पास केलेले आहेत. माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, माननीय मंत्री श्री.छगन भुजबळ तसेच माननीय मंत्री श्री.विजय वडेट्टीवार असो, ते आयोगाच्या बैठकीत कसे उपस्थित राहिले ? अशा अनेक गोष्टी न्यायालयाने दिलेल्या निकालामधून समोर आलेल्या आहेत. सदनामध्ये माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार उपस्थित आहेत. सभापती महोदय, फक्त राज्य शासनाच्या निष्काळजीपणामुळे राज्यातील संपूर्ण ओबीसी समाज मोठया प्रमाणात अस्वस्थ झाला आहे. शासनाने त्याकडे लक्ष दिले नाही. शासनाने इम्पीरिकल डाटा गोळा करणे, आयोग नेमणे, आयोगाला निधी देणे, कर्मचारी देणे...

यानंतर श्री.गागरे.....

श्री.प्रवीण दरेकर .....

अशा प्रकारच्या विविध गोष्टी नीट टाईम-बाऊंड केल्या असत्या तर मला वाटते की, ओबीसी समाजाचे राजकीय आरक्षण न्यायालयाने फेटाळले नसते.

सभापती महोदय, मला अशी माहिती मिळाली आहे की, आयोगाने दिलेल्या अहवालावर अध्यक्षांची सही असते पण ती सही नसल्याचे सांगितले जाते, अशा प्रकारचे अनेक लुपहोल्स किंवा त्रुटी न्यायालयाने मांडलेल्या आहेत. आपल्या माध्यमातून सरकारला मी विनंती करीत आहे. सध्या महाराष्ट्रात ओबीसी समाज मोठया प्रमाणावर आहे. हे अधिवेशन चालू असल्याने जनता राजकीय आरक्षणाची वाट पाहात आहे, तशा प्रकारचा काल न्यायालयाचा निर्णयही आलेला आहे. त्यामुळे सरकारची नेमकी काय भूमिका आहे, सरकार हे राजकीय आरक्षण कसे देणार हा प्रश्न सर्वांच्या मनात आहे. कोणत्याही परिस्थितीत भारतीय जनता पार्टीने ही भूमिका घेतली आहे की, ओबीसी आरक्षणाशिवाय निवडणुका घेऊ नयेत. आपल्या सर्वांचीच तीच भूमिका आहे. पण सरकार जाणीवपूर्वक दुर्लक्ष करते की काय ? की कोणाचा दबाव या ओबीसी आरक्षणासंदर्भात आहे, हे सभागृहाला माहिती होणे अपेक्षीत आहे. म्हणून आपल्या माध्यमातून सरकारला विनंती आहे की, या आरक्षणासंदर्भात सरकार नेमके काय करणार आहे. हे राजकीय आरक्षण कसे देणार आहे. निवडणुकीसंदर्भात सरकारची काय भूमिका आहे हे सरकारने स्पष्ट करण्याची आवश्यकता आहे.

श्री.अजित पवार : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री.प्रवीण दरेकर यांनी ओबीसी बाबत महत्वाचा विषय उपस्थित केला आहे, मी महाविकास आघाडी सरकारच्या वतीने स्पष्टपणे विधिमंडळाला व महाराष्ट्रातील जनतेला स्पष्टपणे सांगू इच्छितो की, ओबीसीचे आरक्षण राहिले पाहिजेत, त्याशिवाय निवडणुका घेऊ नयेत, या मताचे आम्ही आहोत.

सभापती महोदय, या विषयावर अनेक वर्षापासून चर्चा सुरु आहे. मला त्यामध्ये राजकारण आणायचे नाही. पाठीमागे व त्यामागच्या लोकांनी काय केले, आताचे काय करतात, पण हा प्रश्न सुटला पाहिजे, राजकीय दृष्टीकोनातून याकडे

श्री.अजित पवार.....

कोणीच पाहू नये. यामध्ये कोणीही राजकारण करु नये. आता येथे इम्पीरिकल डाटाबाबत सांगितले गेले. काही गावांचा येथे उल्लेख केला की, या ४-५ गावांचा डाटा कोणी तरी ५ दिवसात गोळा केला. असे कोणीही डाटा गोळा करुन चालत नाही. त्याला काही नियम व पध्दत आहे. त्या पध्दतीनेच करावे लागते, म्हणून आपण मागासवर्ग आयोगाला सांगितले होते की, आम्ही तुम्हाला ते काम देतो, त्यांनी अमुक इतका निधी मागितला होता, तो निधी या सरकारने दिलेला आहे. त्यात कोणताही हलगर्जीपणा महाविकास आघाडी सरकारने केला नाही. हे सर्व करीत असताना वेळोवेळी चांगले वकील देणे, त्याबाबत चर्चा करणे याकरीता आमचे मंत्रिमंडळातील सहकारी माननीय श्री.छगन भुजबळ यांनी वकीलांची वेगळी टीम देखील तिकडे लावली होती. सगळीकडून सर्व प्रयत्न सर्वांनी केला आहे, सर्वोच्च न्यायालयाने जो निकाल द्यायचा आहे तो दिलेला आहे. ओबीसी समाज मोठया प्रमाणावर असतानाही परवा १०५ नगरपंचायतीच्या निवडणुका झाल्या, त्यात ओबीसींना प्रतिनिधीत्व मिळाले नाही. आता सुमारे दोन तृतीअंश ठिकाणी निवडणुका आहेत, २५-२६ जिल्हा परिषदा, महानगरपालिका, नगरपालिका त्यात आहेत. सभापती महोदय, आपली फलटणही नगरपालिकाही त्यात आहे. ७०-७५ टक्के मतदार या निवडणुकीत मतदान करणार आहेत, एवढया मोठया निवडणुका समोर आ वासून उभ्या आहेत. ओबीसी वर्गाला प्रतिनिधीत्व देण्यापासून वंचित ठेवणे मुख्यमंत्री व मंत्रिमंडळाला अजिबात मान्य नाही. काल मंत्रिमंडळाच्या बैठकीत याबाबत मोठी चर्चा झाली, आज सायंकाळी पुन्हा मंत्रिमंडळाची बैठक आहे. याद्वारे आम्ही नवीन विधेयक आणण्याचे काम करीत आहोत. मध्यप्रदेश सरकारने काय केले? निवडणुका कधी घ्याव्यात हे निवडणुक आयोगाच्या हातात आहे, ते राज्य सरकारच्या हातात नाही. परंतु प्रभाग रचना किंवा बाकीची तयारी करण्याचा मध्यप्रदेशने स्वत: निर्णय घेतलेला आहे. मध्यप्रदेशची उदाहरणे दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी चर्चा करताना येथे मांडली आहेत, आम्ही त्यांच्याकडूनही माहिती मागवलेली आहे. त्यांना कोणत्या गोष्टीचा फायदा झाला, तशा प्रकारचे विधेयक आम्ही तयार करीत आहोत, त्या विधेयकाला आम्ही आजच्या

श्री.अजित पवार.....

मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देत आहोत. ते विधेयक सोमवारी सभागृहात चर्चेला दाखविण्यात येईल. मी दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना विनंती करणार आहे की, सभागृहाने एकमताने ते विधेयक मंजूर करावे. मागे अशा एका विधेयक मंजूरीच्या वेळी एकमत होण्यासाठी सभापती महोदयांनी मदत केली होती. यानंतर आपण निवडणूक आयोगाला कळवू. मागे आपण मंत्रिमंडळाचा व विधिमंडळाचा ठराव केला होता, पण कायद्याने तो अधिकार त्यांचा आहे. शेवटी ऐकायचे की नाही हे त्यांच्या हातामध्ये असते. त्यातून कारण नसताना गैरसमज निर्माण होतात की, यातून राजकारण केले जाते. मुद्दाम कोणाचा तरी दबाब असल्याचे म्हटले जाते, मी सांगू इच्छितो की, आमच्यावर कोणाचाही दवाब नाही. आम्ही कोणाच्या दबावाला भिक घालत नाही असे याबाबत मी स्पष्टपणे सांगतो.

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, मी बोलू इच्छितो.

**सभापती** : या विषयावर काही सदस्य बोलू इच्छितात पण मी सांगू इच्छितो की, नियम २८९ अन्वये प्रस्तावाच्या सूचनेवर मी फक्त माननीय विरोधी पक्ष नेत्यांना बोलण्याची परवानगी दिलेली आहे. त्यामुळे बोलण्यास इच्छुक सन्माननीय सदस्यांनी ऐकावे. उपमुख्यमंत्री महोदय बोलत आहेत, त्यांचे उत्तर होऊ द्यावे. उपमुख्यमंत्री महोदयांनी स्पष्ट सांगितले आहे.

श्री.गोपिचंद पडळकर : सभापती महोदय, ...

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.चंद्रशेखर बावनकुळे व श्री.गोपीचंद पडळकर हे नियम २८९ च्या प्रस्तावाच्या सूचनेवर बोलू इच्छितात पण मी त्यांना सांगू इच्छितो की, मी बोलण्याची परवानगी देणार नाही. कारण सोमवारी याबाबत विधेयक मांडले जाणार असल्याचे साक्षात उपमुख्यमंत्री महोदय सांगत आहेत, मग तुम्ही नियम २८९ च्या प्रस्तावाच्या सूचनेवर सदनाचा वेळ का घेत आहात ? आता उपमुख्यमंत्री महोदयांनी त्यांचे उत्तर पूर्ण करावे.

श्री.अजित पवार : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते यांनी उपस्थित केलेला मुद्दा अतिशय भावनिक झालेला आहे. संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष याकडे लागले आहे. राज्य सरकारने देखील ही बाब अत्यंत गांभीर्याने घेतलेली आहे. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितलेल्या गोष्टी घडलेल्या आहेत, त्याबाबत दुमत असण्याचे काही कारण नाही. आम्ही घेणार असलेली बैठक ऑफ द रेकॉर्ड घेण्याबाबत चर्चा झाली होती. तरी ती रेकॉर्डवर आणली गेली. वास्तविक त्यातून मार्ग निघावा ही चांगली भावना आमची सर्वांचीच होती. त्याबद्दल कृपया कोणी गैरसमज करुन घेऊ नये. म्हणून आज सायंकाळच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा विषय मंजूर करुन घेऊन त्यास मान्यता देऊन आम्ही सोमवारी सभागृहात विधेयक आणत आहोत. सोमवारी आपण सर्व जण ते विधेयक मंजूर करुया. तशा प्रकारची अंमलबजावणी करुन ओबीसी समाजाला प्रतिनिधीत्वापासून वंचित राहण्याचा आलेला प्रसंग दूर करु. तोपर्यंत महानगरपालिका, जिल्हा परिषद, तालुका पंचायत, पंचायत समित्यावर प्रशासक आला तरी चालेल, प्रशासक ठेवू. आता काही जिल्हा परिषद व महानगरपालिकेवर प्रशासक येतील. ते आल्यावर मधल्या ठरावीक काळात जो इम्पीरिकल डाटा गोळा करायचा आहे व बाकीची तयारी करायची आहे ती सर्व तयारी करुन सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे आरक्षण देऊनच महाराष्ट्रात निवडणुका घेण्याचा प्रयत्न राहील.

**सभापती** : या विषयावरील चर्चा संपली आहे.

------

असुधारित प्रत

## पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे

## खुलदाबाद (जि.औरंगाबाद) येथील धांड नदीचे पाणी गिरजा मध्यम प्रकल्पात वळते करणेबाबत

**(१) * ११८०० श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खुलदाबाद (जि.औरंगाबाद) तालुक्यात सर्वात मोठा गिरजा मध्यम प्रकल्प आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, म्हैसमाळ येथून उगम पावणाऱ्या गिरजा नदीवरील सदर प्रकल्पातून ८० टक्के गावांना पिण्यासाठी व शेतीसाठी लागणारे पाणी घेतले जात असून सदर प्रकल्प पर्जन्यवृष्टीअभावी पूर्ण क्षमतेने भरत नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मौजे बोडखा येथून उगम पावणाऱ्या धांड नदीवर मौजे बाजार सावंगी ते गिरजा प्रकल्प (२.५ किमी) दरम्यान कॅनॉल करुन पाणी वळते केल्यास सदर प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरुन पिण्याच्या पाण्यासाठी व शेती सिंचनासाठी मदत होईल, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, गिरजा मध्यम प्रकल्प पूर्ण भरण्याच्यादृष्टीने धांड नदीवर बाजार सावंगी ते गिरजा मध्यम प्रकल्पापर्यंत कॅनॉल करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

गिरजा मध्यम प्रकल्पाचे बांधकाम सन १९८७ साली पूर्ण करण्यात आले. सदर प्रकल्पात ३३ वर्षात ५ वेळा ७५ टक्के पेक्षा जास्त, १६ वेळा ७५ टक्के पेक्षा कमी व १२ वेळा शुन्य जलसाठा दिसून आला. सदर प्रकल्प पूर्ण क्षमतेने दरवर्षी भरत नाही.

(३) होय.

(४) खुलदाबाद तालुक्यातील धांड नदीचे पाणी गिरजा मध्यम प्रकल्पात वळविणे बाबतचा पाणी उपलब्धता प्रस्ताव मुख्य अभियंता, नियोजन व जलविज्ञान, नाशिक यांना सादर करण्यात आला. सदर प्रस्तावाबाबत मुख्य अभियंता, नियोजन व जलविज्ञान, नाशिक यांनी प्रस्तावित योजना पुर्णा उपखोऱ्यात सिध्देश्वर प्रकल्पाच्या

ता.प्र.क्र.११८००.....
श्री.जयंत पाटील .....
वरील क्षेत्रात येत असून सदर भागात उपलब्ध येव्यापेक्षा मंजूर पाणी वापर जास्त असल्याने सदर योजनेस पाणी उपलब्ध होऊ शकणार नाही, असे कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येतात व फलक फडकावून घोषणा देत असतात.)

श्री.सतीश चव्हाण : सभापती महोदय, खुलदाबाद हा अवर्षणप्रवण तालुका आहे. आज सुमारे ८० गावांना गिरजा मध्यम प्रकल्पातून पाणीपुरवठा होतो. पण मागील २० वर्षाचा डाटा आपण पहावा.

यानंतर श्रीमती नाफडे .....

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.११८००......

श्री.सतीश चव्हाण......

( विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य फलक फडकवित वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

३३ वर्षांमध्ये केवळ तीन वेळा हे धरण पूर्ण भरलेले आहे. एक छोटासा अडीच कि.मी.चा कॅनॉल जर काढला गेला तर खूप बरे होईल. सर्व भारतभर नदीजोड प्रकल्पांबाबत चर्चा केली जाते. गोदावरीमध्ये पाणी आणण्याबाबत चर्चा केली जाते. परंतु त्याच वेळेस केवळ अडीच कि.मी.चा कॅनॉल काढल्यानंतर हे धरण जर भरत असेल आणि ८० गावांना त्यामुळे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होत असेल, ॲश्योर्ड शेतीला पाणी मिळणार असताना देखील अडीच कि.मी.चा कॅनॉल केवळ एका तांत्रिक अडचणींमुळे केला जात नसेल तर हे महाविकास आघाडी सरकारच्या दृष्टीने भुषणावह नाही. माननीय मंत्रीमहोदय आपण कर्तबगार जलसंपदा मंत्री आहात. आपण मराठवाडयाला नेहमीच न्याय देण्याचा प्रयत्न केलेला आहे. मागील काळात जवळपास ५०-६० धरण.........(अडथळा) आपण घेतलेल्या निर्णयामुळे मराठवाडयाला पाणी मिळालेले आहे. केवळ अडीच कि.मी.चा कॅनॉल काढल्यानंतर हे धरण जर भरत असेल तर......(अडथळा) केवळ तज्ज्ञांनी दिलेल्या आकडेवारीवर विसंबून न राहता "राजकीय निर्णय" म्हणून हा अडीच कि.मी.च्या कॅनॉलबाबतचा निर्णय घेण्यात येणार आहे का, या निर्णयामुळे ८० गावांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटेल.

( विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य फलक फडकवित वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य जे म्हणत आहेत, ते सर्वच योग्य आहे. परंतु आपल्याला हेही लक्षात घेतले पाहिजे की, तेथे खाली सिध्देश्वर प्रकल्प आहे. या सिध्देश्वर प्रकल्पाचे यील्ड ११४८ एमएमक्यू इतके आहे. त्यातील पाणीवापर १३९९ एमएमक्यू इतका आहे. अगोदरच येथे पाणीपुरवठा

ता.प्र.क्र.११८००

श्री.जयंत पाटील......

तुटीत आहे. बाजारसावंगीतून खाली जे पाणी येणार आहे, ते पाणी या सिध्देश्वर तलावामध्ये येते. या कॅनॉलमुळे सिध्देश्वर तलावाचे पाणी कमी केल्यासारखे होईल. यामुळे असे कॅनॉल वगैरे करणे योग्य होणार नाही. बाजारसावंगीपासून सिध्देश्वर प्रकल्पाकडे येणारे पाणी थांबवून डायव्हर्ट केले तर सिध्देश्वर प्रकल्पाची तूट वाढेल. खाली पाण्याची तूट वाढण्यामुळे आणखी गोंधळ होण्याची शक्यता आहे.

( विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य फलक फडकवित वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

**सभापती :** प्रश्नाचे उत्तर देण्यात आलेले आहे.

-----------

असुधारित प्रत

## कोकणातील पश्चिम वाहिनी नदयांचे अतिरिक्त पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याबाबत

**(२) * १२५५७ डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अभिजित वंजारी, श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोदावरी खोऱ्यात पश्चिम वाहिनी उल्हास, वैतरणा, दमणगंगा या नद्यांतील अतिरिक्त वाया जाणारे पाणी वळविण्यासंदर्भात एकात्मिक जल आराखड्यामध्ये नियोजन करुन तसा प्राथमिक प्रस्ताव मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक, लाभक्षेत्र विकास, जलसंपदा विभाग, औरंगाबाद यांनी शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावावर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे, तसेच गोदावरी खोऱ्यात नद्यांचे पाणी वळविण्याच्या योजनांना विलंब होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रस्तावाच्या अनुषंगाने पश्चिम वाहिनी उल्हास, वैतरणा, दमणगंगा या नद्यांतील अतिरिक्त वाया जाणारे पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याबाबत व सदर प्रस्तावाला निधीची उपलब्धता करुन योजना पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील :** (१) होय, अंशत: खरे आहे.

शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१९/ (११२/२०१९) जसंअ दिनांक १७/०९/२०१९ अन्वये, पश्चिम वाहिनी नदीखोऱ्यातून (कोकण) अतिरिक्त पाणी मराठवाड्यात वळविणेसाठी प्राथमिक अभ्यास करणेसाठी कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांचे अध्यक्षतेखाली गठीत समितीचा अहवाल समितीचे सदस्य सचिव तथा अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, औरंगाबाद यांनी त्यांचे पत्र दिनांक ३१/१०/२०१९ अन्वये शासनास सादर केलेला आहे.

(२) उपरोक्त गठित समितीने एकूण ८९.८५ अ.घ.फु. पाणी कोकणातून गोदावरी खोऱ्यात वळविणे बाबत शिफारस केली आहे. त्यापैकी ८१.४५ अ.घ.फु. उपसा वळण योजना असून ८.४० अ.घ.फु. प्रवाही वळण योजना आहेत. प्रवाही

ता.प्र.क्र.१२५५७....

श्री.जयंत पाटील....

योजनांपैकी १४ योजना (१.०७ अ.घ.फु.) पूर्ण करण्यात आल्या असून, ५ योजना (१.३६ अ.घ.फु.) बांधकामाधीन आहेत व १२ योजना (५.९८ अ.घ.फु.) सर्वेक्षण /अन्वेषण/प्रकल्प अहवाल तयार करण्याच्या विविध टप्प्यात प्रगतीत आहे.

उपसा वळण योजनेपैकी पार-गोदावरी नदीजोड योजनेचा (३.४२ अ.घ.फु) प्रकल्प अहवाल तयार झालेला असून राज्य तांत्रिक सल्लागार समितीकडे तपासणीत आहे. दमणगंगा-वैतरणा-गोदावरी (७.१३ अ.घ.फु.), दमणगंगा-एकदरे-गोदावरी (५.०० अ.घ.फु.) प्रकल्पाचे सविस्तर प्रकल्प अहवाल राष्ट्रीय विकास अभिकरण, नवी दिल्ली मार्फत तयार करण्यात येत असून जून, २०२२ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे. वैतरणा व उल्हास नदीखोऱ्यातून गोदावरी खोऱ्यात पाणी वळविणेबाबतच्या योजना सर्वेक्षणाधीन आहेत.

उपरोक्त प्रमाणे कार्यवाही प्रगतीत असल्याने गोदावरी खोऱ्यात नदयांचे पाणी वळविण्याच्या योजनांना विलंब होण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) उपरोक्त प्रमाणे कार्यवाही प्रगतीत असल्याने शासनाने चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

उपरोक्त नदीजोड योजनांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार झाल्यानंतर त्यास राज्य तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांची मान्यता तसेच महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम २००५ कलम ११ (च) अंतर्गत महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर, राज्याच्या आर्थोपायाची स्थिती व मा.राज्यपाल महोदयांचे निदेश यानुसार प्रशासकीय मान्यता देणे शक्य आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही प्रगतीत असून सदरील नदीजोड योजनांना प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर निधीची तरतूद करणे शक्य आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

( सभागृहाच्या वेलमध्ये येऊन विरोधी पक्षातील अनेक सदस्य सभागृहाच्या वेलमध्ये येऊन फलक झळकवत मोठमोठयाने घोषणा देत असतात.)

**सभापती :** सदनाचे एकंदरीत वातावरण बघता मी सदनाचे कामकाज २० मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी १२.२३ ते १२.४३ वाजेपर्यंत स्थगित झाली.)

--------------

असुधारित प्रत

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**नियम २८९ अन्वये बिलाच्या सूचनेसंबंधी**

**सभापती** : मी माननीय विरोधी पक्षनेते श्री. प्रवीण दरेकर यांना माझी अडचण सांगत आहे. मी या विषयावर यापूर्वीही बोललो आहे. माननीय विरोधी पक्षाने म.वि.प. नियम २८९ अन्वये प्रस्ताव दिलेला असून, तो मी एका मिनिटातच मान्य केला होता. त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.गोपीचंद पडळकर यांनी बोलण्यासाठी हात वर केला. लगेचच त्यांच्या बाजूला बसणाऱ्या सन्माननीय सदस्यांनी देखील बोलण्यासाठी हात वर केला होता. मला असा पायंडा पडू द्यायचा नाही. प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतरच विरोधी पक्षाने म.वि.प. नियम २८९ अन्वये प्रस्तावासंबंधी चर्चा सुरु करावी किंवा कसे हे ठरविण्याचा अधिकार माझा आहे. मी आता सन्माननीय सदस्य श्री.गोपीचंद पडळकर यांना बोलण्यासाठी अनुमती देत आहे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी म.वि.प. नियम २८९ अन्वये प्रस्ताव दिलेला असून, तो अतिशय महत्वाचा आहे. त्यासंबंधी त्यांनी केलेली मांडणी अतिशय मुद्देसुद आणि समर्थनीय होती, याबद्दल कोणताही वाद नाही. मी त्याचा समर्थक आहे. तथापि, त्यानंतर सदनात गोंधळ झाला होता. मी या सदनाकडून आणि माननीय सभापती महोदयांकडून अशी अपेक्षा व्यक्त करीत आहे की, या ठिकाणी दिल्या जाणाऱ्या घोषणांबाबत प्रत्येक सन्माननीय सदस्यांनी मर्यादा पाळली पाहिजे. अशा घोषणांच्या संदर्भात माननीय सभापती महोदयांनी तीव्र विरोधी करण्याची गरज आहे. घोषणांचा कठोर धिक्कार केला पाहिजे. पण *** अशा पध्दतीचे शब्दप्रयोग या सदनात होता कामा नये, एवढीच माझी आपल्याकडून प्रामाणिक अपेक्षा आहे.

**सभापती** : ठीक आहे. असे शब्द प्रयोग केले असतील तर ते मी तपासून घेऊन काढून टाकतो.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, यासंदर्भात माननीय विरोधी पक्षनेत्यांनी पुढाकार घेण्याची आवश्यकता आहे. ते सदनात नेहमीच मर्यादा पाळून

---

*** आदेशानुसार विलोपित मजकूर

असुधारित प्रत

श्री. कपिल पाटील.....

बोलत असतात. अशा प्रकारचे शब्दप्रयोग या सदनात होता कामा नये, एवढीच माझी विनंती आहे.

**सभापती** : ठीक आहे. आपली विनंती मान्य करण्यात येत आहे.

श्री. गोपीचंद पडळकर : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री. प्रवीण दरेकर यांनी ओबीसीचा राजकीय स्थानिक स्वराज्य संस्थेतील आरक्षणाचा विषय उपस्थित केला होता. त्या विषयामध्ये......

श्री. शशिकांत शिंदे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी म.वि.प. नियम २८९ अन्वये प्रस्ताव दिलेला आहे. आता सदनाच्या प्रथा आणि परंपरेनुसार तारांकित प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतरच माननीय विरोधी पक्षनेत्यांनी म.वि.प. नियम २८९ अन्वये प्रस्तावासंबंधी चर्चेला सुरुवात करावी. तारांकित प्रश्नोत्तरे घेतली जावीत असे माननीय सभापती महोदयांनी वारंवार सदनात सांगितलेले आहे. तारांकित प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर माननीय विरोधी पक्षनेते श्री. प्रवीण दरेकर यांनाच बोलण्याची संधी दिली जाईल असा निर्णय माननीय सभापती महोदयांनी घेतलेला आहे. आपण सर्वांना बोलण्याची संधी देणार असाल तर आम्हाला देखील या विषयावर बोलण्यासाठी संधी द्यावी, अशी आमची विनंती आहे.

**सभापती** : असे होणार नाही.

श्री. शशिकांत शिंदे : सभापती महोदय, ओबीसीचा विषय हा केवळ माननीय विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांचा आहे असे नाही. आम्हाला देखील या विषयावर बोलण्याची संधी द्यावी, अशी आमची विनंती आहे.

(दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

**सभापती** : मी सदनातील सर्व सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, तारांकित प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

असुधारित प्रत

-----

( विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात. )

**पृ. शी.** : लेखी उत्तरे

**मु. शी.** : अतारांकित प्रश्नोत्तरांची पहिली, दुसरी, तिसरी, चौथी, पाचवी, सहावी, सातवी, आठवी, नववी, दहावी, अकरावी, बारावी, तेरावी, चौदावी व पंधरावी यादी सभागृहासमोर ठेवणे

**सभापती** : आजच्या कामकाजपत्रिकेत अनुक्रमांक-दोन, प्रश्नोत्तरे (ख) अंतर्गत दर्शविण्यात आलेली अतारांकित प्रश्नोत्तरांची पहिली, दुसरी, तिसरी, चौथी, पाचवी, सहावी, सातवी, आठवी, नववी, दहावी, अकरावी, बारावी, तेरावी, चौदावी व पंधरावी यादी सभागृह ाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे मी घोषित करतो.

( प्रेस : येथे अतारांकित प्रश्नोत्तरांच्या याद्या छापाव्यात.)

-------

असुधारित प्रत

( विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये घोषणा देतच असतात. )

**पृ.शी. / मु.शी.** : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

ॲड. अनिल परब ( संसदीय कार्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "लोकआयुक्त आणि उप लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचा त्रेचाळीसावा वार्षिक एकत्रित अहवाल स्पष्टीकरणात्मक ज्ञापनासह" सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-------

श्रीमती आदिती तटकरे ( उद्योग राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "मराठवाडा विकास महामंडळ मर्यादित, औरंगाबाद यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा त्रेपन्नावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-------

ॲड. अनिल परब ( परिवहन मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल रिट याचिका क्र. २१६९९/२०२१ महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ विरुध्द संघर्ष एस.टी. कामगार संघटना आणि इतर या याचिकेतील मा.उच्च न्यायालय यांच्या आदेशानुसार शासन निर्णय दिनांक ८.११.२०२१ नुसार मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या त्रिसदस्यीय समितीचा अहवाल" सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-------

असुधारित प्रत

( विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये घोषणा देतच असतात. )

**पृ.शी./मु.शी.** : नियम ९३ अन्वये सूचना

**सभापती :** माझ्याकडे आज शुक्रवार, दिनांक ४ मार्च, २०२२ रोजी म.वि.प.नियम ९३ अन्वये प्राप्त झालेल्या सूचनांपैकी मान्य करण्यात आलेल्या सूचना व त्यावरील माझे निर्णय सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे मी घोषित करतो.

(प्रेस : येथे नियम ९३ च्या सूचना व त्यावरील निर्णय जोडावेत.)

-------

असुधारित प्रत

( विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये घोषणा देतच असतात. )

**सभागृहापुढील कामकाजाबाबत**

**सभापती** : आजच्या कामकाजपत्रिकेत अनुक्रमांक-पाच अंतर्गत दर्शविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात येत आहेत.

तसेच अनुक्रमांक-सहा अंतर्गत म.वि.प.नियम १०१-अ अंतर्गत दर्शविण्यात आलेल्या विशेष उल्लेखाच्या सूचना सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे मी घोषित करतो.

अनुक्रमांक-सात अंतर्गत दर्शविण्यात आलेली माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चा सोमवार, दिनांक ७ मार्च, २०२२ रोजी घेण्यात येईल.

आज रोजी प्राप्त झालेले औचित्याचे मुद्दे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे मी घोषित करतो.

यानंतर श्री. बोर्डे.....

असुधारित प्रत

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये फलक फडकावून

घोषणा देतच असतात.)

**सभापती**.......

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाच्या निदर्शनास आणून देण्यात येते की, यापूर्वी उद्या शनिवार, दिनांक ५ मार्च, २०२२ रोजी सभागृहाची बैठक घेण्याचे निश्चित करण्यात आले होते. परंतु उद्या सभागृहाची बैठक होणार नाही.

सभागृहाची बैठक सोमवार, दिनांक ७ मार्च, २०२२ रोजी सकाळी १०.०० वाजता पुन्हा भरेल. सकाळी १०.०० ते ११.४५ वाजेपर्यंत सभागृहाची विशेष बैठक होईल. उक्त बैठकीत लक्षवेधी सूचना घेण्यात येतील. त्यानंतर दुपारी १२.०० वाजता सभागृहाची नियमित बैठक पुन्हा सुरु होईल.

(सभागृहाची बैठक दुपारी १२ वाजून ५० मिनिटांनी, सोमवार, दिनांक ७ मार्च, २०२२ च्या सकाळी १०.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.)

------

असुधारित प्रत